08-02-2025-Dai-04new_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/07/2025 10:48 PM Page 1



## निवडक

### देव गोळोबा देवस्थान मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्याला सुरुवात

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. ७ :** कोनाडी, कोरगाव श्री देव गोळोबा देवस्थान मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा शुक्रवार दि. ७ ते दि. १६ दरम्यान विविध धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमांशी होणार आहे.शुक्रवार दि. ७ रोजी सकाळी ७ वाजता कुडाळ येथून मूर्तीचे नयबाग येथे आगमन झाले. स्थानिक भजनी कलाकारांचा भजन कार्यक्रम झाला. शनिवार दि. ८ रोजी सकाळी ७ ते दुपारी १ वाजता मूर्तीचा स्नान विधी, शय्याधिवास, ब्रम्हादिमंडलादी देवतांची स्थापना. रात्री ७ वाजता संकेत सखाराम गोडकर आणि साथी कलाकरांचा भजनाचा कार्यक्रम. रविवार दि. ९ रोजी सकाळी ७ ते दुपारी २ पर्यंत मंगलाचरण आवाहित देवतांची पूजा, अग्नि स्थापना ग्रहस्थापना, वास्तुहोम, ग्रहहोम, प्रधान पर्याय होम, तत्व होम, वास्तुतत्वन्यास. संध्याकाळी ७ वाजता युवा कीर्तनकारांचा चक्री कीर्तन कार्यक्रम होईल. सोमवार दि. १० रोजी सकाळी ७ ते दुपारी १ पर्यंत १०.३९ या मुहूर्तावर देवाची प्रतिष्ठापना, महाआरती, देवतांची प्रार्थना, महाप्रसाद. संध्याकाळी ५ वाजता भावगीतांचा सदाबहार नजराणा सप्तसुर झंकारीत बाले. मंगळवार दि. ११ संध्याकाळी ४ वाजता 'श्री सत्यनारायण महापूजा' आरती व तीर्थप्रसाद. बुधवार दि. १२ रोजी सका. ११ वाजता श्री देव गोळोबा देवाची महापूजा, दुपारी १ वाजता आरती व महाप्रसाद, ४ वाजता श्री सत्यनारायण महापूजा, तीर्थप्रसाद. गुरुवार दि. १३ रोजी सायकाळी ७ वाजता अभिनय पणजी प्रस्तुत, तुफान विनोदी नाटक 'आमचो ढिंच्याक बाबा' होणार आहे शुक्रवार दि. १४ रोजी सकाळी १०.३० वाजता श्री सत्यनारायण महापूजा संध्याकाळी ७ वाजता संगीत ऐतिहासिक नाटक 'रायगडचा राजेश्वर' सादर होणार आहे. शनिवार दि. १५ रोजी संध्याकाळी ७ वाजता एकांकिका गायन समाज देवल क्लब कोल्हापूर – ऑलमोस्ट डेड निर्मिती थिएटर कुडाळ ऑफलाईन, आयडियल इं. मि. स्कूल, नेरूर सादरकर्ते तरंगत्या बेटावर. रविवार दि. १६ सकाळी १० वाजता 'श्री सत्यनारायण महापूजा', संध्याकाळी ७ वाजता 'बाळा जो जो रे' (सामाजिक नाटक) सादर होणार आहे. या कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री देव गोळोबा देवस्थान समितीचे अध्यक्ष विश्वास नारोजी आणि समितीच्या पदाधिकाऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी केले आहे.



**पेडणे : पत्रकार परीषदेत माहिती देताना प्रकाश तलवणेकर. बाजूला राजमोहन शेट्ये व सूर्यकांत चोडणकर.**

### पेडणेत आज विष्णू वाघ यांचा स्मृती दिन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. ७ :** गोमंतकाचे सिद्धहस्त लेखक कवी नाटककार अभीनेते, खेळाडू, दिग्दर्शक, गायक, पत्रकार विचारवंत, उत्कृष्ट वक्ता असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व माजी आमदार स्व. विष्णू सुर्या वाघ याच्या स्म्रुती दिनाच्या निमित्ताने पेडणे तालुका पत्रकार समीती त्रीसुपर्ण गोवा व विष्णू वाघ प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने एका विषेश कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याची माहिती पेडणे तालुका पत्रकार समीती चे अध्यक्ष प्रकाश तळावणेकर यानी एका पत्रकार परिषदेत दिली, शनिवारी दि. ८ रोजी दुपारी ३.३०वाजता पेडणे येथील श्री देवी भगवती हायस्कूल सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात पेडणे तालुक्यातील पुरस्कार प्राप्त व व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले निव्रत्त पोलीस अधिकारी धनंजय शेटगावकर व ज्येष्ठ साहित्यिक रामचंद्र सोनु दामाजी यांचा सत्कार होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पेडणेचे आमदार प्रवीण आर्लेकर हे असतील तर प्रमुख पाहुण्या म्हणून पेडणे उच्चमाध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या राजश्री रेडकर व खास निमंत्रित म्हणून जेष्ठ साहित्यिक चंद्रकांत जाधव हे उपस्थित असतील. त्याशिवाय, त्रीसुपर्ण गोवाचे अध्यक्ष राजमोहन शेट्ये, विष्णू वाघ प्रतिष्ठान च्या अध्यक्षा अरुणा वाघ व पेडणे पत्रकार समीती चे अध्यक्ष प्रकाश तळावणेकर हे व्यासपीठावर उपस्थित असतील. गेल्या वर्षापासून पेडणे पत्रकार संघ हा कार्यक्रम पेडणेत आयोजित करीत असून या कार्यक्रमाला पेडणे तालुक्यातील विष्णू वाघ यांचे चाहते मोठ्या प्रमाणात उपस्थित असतात, अशी माहिती प्रकाश तळावणेकर यानी दिली. या कार्यक्रमास पेडण्यातील सर्व विष्णू वाघ प्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे

### घोटेली क्र. २ शाळेचे आज स्नेहसंमेलन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. ७ :** सरकारी प्राथमिक आणि पूर्वप्राथमिक विद्यालय घोटेली क्र. २ केरी–सत्तरीचे वार्षिक स्नेहसंमेलन व व बक्षीस वितरण शनिवार दि. ८ रोजी संध्याकाळी ६ वाजता शाळेच्या पटांगणावर आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून साखळी उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्रीकृष्ण नाईक,प्रमुख अतिथी म्हणून गोवा आरोग्य खात्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गौरिश गांजेकर, प्रमुख पाहुण्या सरपंच सुप्रिया गावस, खास निमंत्रित पंचसदस्य राजेश गावस, खास आमंत्रित माजी विद्यार्थी संघटनेचे बाबली गावस, तसेच विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निशा गावस,कार्यकारी मुख्याध्यापिका आस्था नाईक उपस्थित रहाणार आहेत. यावेळी वर्षभरातील स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात येणार असून त्यानंतर विद्यार्थ्यांतर्फे विविधरंगी सांस्कृतिक लोकनृत्याचा कार्यक्रम होणार आहेत.सदर कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती लावावी असे आवाहन करण्यात आले आहे.

### विवेकानंद विद्यामंदिरात आज बाजार दिन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. ७ :** केरी–सत्तरी येथील स्वामी विवेकानंद स्मृती संघ संचालित विवेकानंद शिक्षण संस्तेच्या विवेकानंद विद्यामंदिरात शनिवार दि. ८ रोजी बाजार दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते दुपारी १२ या कालावधीत हा बाजार भरणार असून यात वेगवेगळ्या भाज्या, फराळ, फळे, वेगवेगळ्या वस्तू, घरगुती खाण्याचे पदार्थ व इतर बरेच काही उपलब्ध असणार असून मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी पालकांनी व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### बारावीच्या परीक्षेची साखळी केंद्रातील आसन व्यवस्था

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. ७ :** गोवा शालान्त मंडळाच्या बारावीच्या परीक्षेसाठी सांखळी केंद्राची आसन व्यवस्था खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.या परीक्षेचे मुख्य केंद्र सरकारी उच्च माध्यमिक विद्यालय सांखळी हे आहे. प्रोग्रेस मिडल स्कुल (बाल मंदिर) गोकुळवाडी सांखळी येथे कला शाखेचे आसन क्रमांक ५८४२५ ते ५८४२७ हे सीडब्ल्यूएसएनचे तीन विद्यार्थी तसेच आसन क्रमांक ५८६४८–५८८२१ हे १७४ विद्यार्थी बसतील. गुरुदास गावस मेमोरियल हायस्कुल गोकुळवाडी सांखळी येथे कला शाखेचे आसन क्रमांक ५८४२८–५८६४७ असे २२० विद्यार्थी बसतील. बाजारातील नगरपालिका इमारतीजवळील प्रोग्रेस हायस्कुल वाणिज्य शाखेचे आसन क्रमांक ५८८२२–५९०९० असे २६९ विद्यार्थी बसतील. सेंट जॉन ऑफ द क्रॉस हायस्कुल सांखळी येथे विज्ञान शाखेचे आसन क्रमांक ५९०९१–५९३८० असे २९० विद्यार्थी बसतील. सरकारी उच्च माध्यमिक विद्यालय सांखळी येथे विज्ञान शाखेचे आसन क्रमांक ५९३८१–५९६७२ असे २९२ विद्यार्थी व व्यावसायिक शाखेचे आसन क्रमांक ५९६७३–५९७८९ असे ११७ विद्यार्थी बसतील.सांखळी केंद्रावर एकूण १३६५ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.सोमवार दि.२४ फेब्रुवारी रोजी असलेल्या गणित या विषयाची परीक्षा सर्व विद्यार्थ्यांसाठी बाजारातील नगरपालिका इमारतीजवळ असलेल्या प्रोग्रेस हायस्कुल येथे होणार आहे. या परीक्षेचे कंडक्टर म्हणून प्राचार्य यशवंत सावंत व ऑब्झर्वर म्हणून मुख्याध्यापिका सारिका नाईक असतील.

# हार्दिक पंड्या पुन्हा होणार कर्णधार!

**मुंबई, दि. ७ :**



हार्दिक पंड्याचे आता चांगले दिवस सुरु झाले असल्याचे पाहायला मिळत आहे. कारण हार्दिक पंड्याला आता पुन्हा एकदा कर्णधारपद मिळणार असल्याचे समोर येत आहे. पण हार्दिक पंड्या कधी भारताचा कर्णधार होणार, हे भारताचे प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी ठरवले आहे. भारताने टी २० वर्ल्ड कप जिंकला आणि त्यानंतर हार्दिक पंड्यावा भारताच्या टी २० कर्णधारपदावरून दूर केले. हार्दिकला दूर सारताना सूर्यकुमार यादवच्या गळ्यात कर्णधारपदाची माळ पडली. त्यानंतर हार्दिक पंड्याचे करिअर संपले अशा वावड्या उठायला सुरुवात झाली होती. पण त्यानंतर हार्दिकने आपला खेळ सुधारला आणि त्याने आपले संघातील स्थान कायम राखले. आता तर हार्दिकला थेट कर्णधारपद मिळणार असल्याचे समोर आले आहे.

भारताने इंग्लंडविरुद्धच्या टी २० मालिकेत विजय साकारला खरा, पण सूर्यकुमार यादवची बॅट शांत असल्याचे पाहायला मिळाले. सूर्यकुमार यादव हा संपूर्ण मालिकेत अपयशी ठरला होता. दुसरीकडे रोहित शर्माही धावांचा दुष्काळ अनुभवत असल्याचे समोर आले आहे. कारण गेल्या बऱ्याच महिन्यांपासून रोहित शर्माच्या बॅटमधून धावा येत नसल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे गौतम गंभीर हे आता मोठे पाऊल उचलण्याच्या तयारीत आहेत.

भारतीय संघ आता चॅम्पियन्स ट्रॉफी खेळण्यासाठी जाणार आहे. ही भारतासाठी सर्वात मोठी स्पर्धा असेल. पण या स्पर्धेत रोहित शर्मा कशी फलंदाजी करतो आणि संघाची कामगिरी कशी होते, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असेल. जर चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताला अपयश आले तर रोहित शर्माच्या जागी हार्दिक पंड्याला कर्णधार करायचे गौतम गंभीरच्या मनात असल्याचे आता समोर आले आहे. त्यामुळे चॅम्पियन्स ट्रॉफीत भारतीय संघ जर विजेतेपद पटकावू शकला नाही तर हार्दिक पंड्या हा भारताचा पुढील कर्णधार असेल, असे आता समोर येत आहे. त्यामुळे रोहित शर्मासाठी ही अग्नीपरीक्षा असेल, असे म्हटले जात आहे.

हार्दिक पंड्याला भारताचे कर्णधारपद मिळणर असल्याचे आता समोर येत आहे. त्यामुळे चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये नेमकं काय होणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

# कोहली दुसऱ्या वनडेसाठी सज्ज ?

**नागपूर, दि. ७ :**



नागपूरमधील विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर झालेल्या भारत आणि इंग्लंड यांच्यातील पहिल्या एकदिवसीय सामन्यात विराट कोहलीला दुखापत झाली. कोहलीऐवजी संघात यशस्वी जयस्वालचा समावेश करण्यात आला. ज्याने गोलंदाजी करणारा अष्टपैलू हर्षित राणासह एकदिवसीय पदार्पण केले. सामन्याच्या आदल्या रात्री कोहलीच्या उजव्या गुडघ्याला दुखापत झाल्याचे रोहित शर्माने टॉसच्या वेळी सांगितले.

कोहलीच्या अनुपस्थितीत, यशस्वीने कर्णधार रोहित शर्मासह भारतासाठी डावाची सुरुवात केली. शुबमन गिलला तिसऱ्या क्रमांकावर पाठवण्यात आले आणि दोन्ही सलामीवीर लवकर बाद झाल्यानंतर त्याने भारताच्या धावांचा पाठलाग करताना शानदार फलंदाजी केली आणि ९६ चेंडूत ८७ धावा केल्या. गिलसह, श्रेयस अय्यर (३६ चेंडूत ५९) आणि अक्षर पटेल (४७ चेंडूत ५२) यांनीही महत्त्वपूर्ण खेळी खेळल्या. भारताला धावांचा पाठलाग करताना कोहलीची अनुपस्थिती जाणवली नाही आणि नागपूरमधील पहिल्या एकदिवसीय सामन्यात ४ विकेट्सने विजय मिळवला आणि तीन सामन्यांच्या मालिकेत १–० अशी आघाडी घेतली.

कटकमधील दुसऱ्या एकदिवसीय सामन्यापूर्वी भारताचा उपकर्णधार शुबमन गिलने विराट कोहलीच्या दुखापतीबद्दल महत्त्वाची माहिती दिली आहे. सामन्यानंतर प्रसारकाशी बोलताना गिलने सांगितले की, कोहलीबद्दल काळजी करण्याचे काही कारण नाही आणि तो पुढील सामन्यासाठी तंदुरुस्त असेल. कालच्या सराव सत्रापर्यंत तो ठीक होता. काळजी करण्याचे काही कारण नाही.

## जडेजाचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६00 बळी पूर्ण

**नागपूर, दि. ७ :**



नागपूर एकदिवसीय सामन्यात भारताने इंग्लंडचा ४ विकेट्सने पराभव केला. जडेजाच्या ३ विकेट्समुळे इंग्लिश संघ ४७.४ षटकांत २४८ धावांवर आटोपला. प्रत्युत्तरात, भारताने ३८.४ षटकांत ६ गडी गमावून लक्ष्य गाठले. गुरुवारी, हर्षित आणि जडेजाची नावे विक्रमांच्या यादीत कायम राहिली. जडेजाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६00 विकेट्स पूर्ण केल्या. तो ६000 धावा आणि ६00 विकेट्स घेणारा दुसरा भारतीय ठरला. तिन्ही फॉरमॅटमध्ये पदार्पणात ३ विकेट्स घेणारा हर्षित एकमेव भारतीय ठरला.

**पहिल्या एकदिवसीय सामन्यातील सर्वोत्तम विक्रम...**

१. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६ हजार धावा आणि ६00 विकेट्स घेणारा रवींद्र जडेजा हा सहावा खेळाडू आहे. ही कामगिरी करणारा तो दुसरा भारतीय आहे. डॅनियल व्हेटोरी आणि शाकिब अल हसन यांच्यानंतर या विक्रमात आपले नाव समाविष्ट करणारा तो तिसरा फिरकी गोलंदाज आहे. कपिल देव, वसीम अक्रम आणि शॉन पोलॉक यांनीही हे केले आहे.

२. जोस बटलरने भारताविरुद्ध १७ एकदिवसीय सामन्यांमध्ये फलंदाजी केली आहे. त्याने पहिल्यांदाच अर्धशतक झळकावले. बटलरने ६७ चेंडूत ५४ धावा केल्या.

३. रोहित शर्माने २0२४–२५ हंगामात सर्व फॉरमॅटमध्ये १६ डावांमध्ये फलंदाजी केली. यामध्ये त्याला १0.३७ च्या सरासरीने फक्त १६६ धावा करता आल्या.

## केसरबाई केरकर विद्यालयात गोवा आंतरशालेय पथनाट्य स्पर्धा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे, दि. ६ :** केरी – फोंडा येथील सुरश्री केसरबाई केरकर विद्यालयात तिसरी अखिल गोवा आंतरशालेय पथनाट्य स्पर्धा उत्साहात झाली. या स्पर्धेत एकूण १६ शाळांनी भाग घेतला.

स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास नामवंत उद्योजक संदीप निगळये, मुख्य अतिथी म्हणून केरी गावच्या सरपंचा तृप्ती नाईक, सेन्ट्रो एदुकादोर संस्थेचे अध्यक्ष संजय प्रियोळकर, शाळेचे व्यवस्थापक जगन्नाथ केरकर, पालक – शिक्षक संघाचे अध्यक्ष सिताराम गावडे उपस्थित होते.



आपले विचार मांडण्यासाठी व आपले कौशल्य सादर करण्यासाठी ही स्पर्धा एक उत्तम माध्यम आहे, असे संदीप निगळये म्हणाले. व्ही. पी. के. चे अध्यक्ष दुर्गादास गावडे समारोप सोहळ्यास प्रमुख पाहुणे तर केरी गावच्या माजी सरपंचा व प्रियोळ मतदारसंघाच्या भाजपाच्या प्रदेशाध्यक्षा अनिशा गावडे खास आमंत्रित म्हणून उपस्थित होत्या.

शाळेच्या मुख्याध्यापिका उषा नाईक यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. या स्पर्धेत कुंकळ्ळी येथील कुंकळ्ळी युनायटेड विद्यालयाला प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. तर के. आर. एस. एस. विद्यालय वळवई – सावईवेरे या शाळेला द्वितीय, रायबंदर येथील बाल भारती विद्या मंदिर शाळेला तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. खोर्लीतील मडकईकर नवचैतन्य विद्यालयाला प्रथम उत्तेजनार्थ बक्षीस तर गावणे येथील महात्मा गांधी सेंटेनरी विद्यालयाला द्वितीय उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त झाले. नाट्य प्रशिक्षक गौतम गावडे यांच्या संकल्पनेतून मागची तीन वर्षे या स्पर्धेचे आयोजन होत आहे. या कार्यक्रमाला शारीरिक शिक्षक संकेत गावकर, इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका शोभा प्रियोळकर व कल्पा जल्मी यांनी केले. ओळख प्राविरा साखरदांडे व मुग्धा जाण यांनी केली. शिक्षिका नारायणी तेंडुलकर व स्नेहा भोमकर यांनी आभार मानले.

## क्रिकेट स्पर्धेत कुंभारजुवे युनियन क्लब, दुसऱ्या सामन्यात मये युनियन विजेते



**टीम दैनिक हेराल्ड**

पेडणे, दि. ७ : मोरजी कांचोळे क्रिकेट क्लबने आयोजित केलेल्या क्रिकेट स्पर्धेमध्ये प्रारंभ सामन्यात कुंभारजूवे क्रिकेट क्लब विरुद्ध कांचोळे क्रिकेट क्लब यांच्यामध्ये स्पर्धा झाली. पहिल्या सामन्यात कांचोळे क्रिकेट क्लब ने १० षटकांमधे चार गडी गमावत ८२ धावा काढल्या. तर कुंभारजुवे क्रिकेट क्लबने नऊ षटक पाच चेंडूमध्ये पाच विकेट गमावत ८३ धावा काढून सामना जिंकला. दुसऱ्या स्पर्धेत कुंभारजुवे क्रिकेट क्लब मये युनियन मध्ये स्पर्धा झाली. मये युनियन संघाने १० षटकांमध्ये सात गडी गमावत ११२ धावा केल्या. तर कुंभारजुवे क्रिकेट क्लबने दहा षटकात आठ गडी गमावत १०७ धावा पर्यंत मजल मारली. या स्पर्धेत मये युनियन पाच गड्यांमध्ये विजेते ठरले. मएम सामनावीर म्हणून साहिल नाईक यांना यांची निवड झाली. मोरर्जी येथील कांचोळे क्रिकेट क्लब ने अखिल गोवा पातळीवर पंचायत क्षेत्रात मर्यादित क्रिकेट स्पर्धेचे आयोंजन मोरर्जी मैदानावर आयोजित करण्यात आले होते. ही स्पर्धा ५ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी पर्यंत आयोजित करण्यात आली. विजेत्या संघाला रोख रुपये साठ हजार रुपये व चषक तर उपविजेत्या संघाला ३0000 रोख आणि ट्रॉफी देण्यात येणार आहे. शुभारंभी दोन सामने पाच रोजी मोरर्जी मैदानावर आयोजित करण्यात आले. या प्रारंभ सामन्याचे उद्घाटन मोरर्जी जिल्हा पंचायत सदस्य सतीश शेटगावकर पंच सदस्य फोटू शेटगावकर, कांचोळे क्रिकेट क्लबचे सदस्य आत्मा शेटगावकर, प्रकाश शेटगावकर, भिवा शेटगावकर, जयराम शेटगावकर, शैलेश शेटगावकर व वेदांत शेटगावकर आदी उपस्थित होते.



**डिचोली : डावीकडून रऊफखान पठाण, राजन कडकडे, विद्याधर शिरोडकर, यशवंत गावस व मुख्याध्यापिका हेमा चणेकर.**

## राधाकृष्ण विद्यालयाला कबड्डी स्पर्धेत विजेतेपद

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. ७ :** राधाकृष्ण विद्यालय, डिचोली येथील १४ वर्षांखालील मुलांच्या संघाने क्रीडा व युवक व्यवहार संचालनालयातर्फे आयोजित राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत शानदार विजय मिळवत विजेतेपद पटकावले. या संघाने तालुका तसेच जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरीय फेरीत प्रवेश मिळवला होता.

मापुसा पेडे येथील इनडोअर स्टेडियममध्ये झालेल्या राज्यस्तरीय अंतिम सामन्यात राधाकृष्ण विद्यालय, डिचोली संघाने सेंट जोसेफ हायस्कूल, नागोवा संघावर अवघ्या दोन गुणांनी रोमांचक विजय मिळवला. अंतिम निकाल ५६–५४ असा होता. संपूर्ण स्पर्धेत संघाचे नेतृत्व राज भुन्या आणि शुभम गवाडे यांनी अतिशय उत्कृष्ट खेळ करत सक्षमपणे पार पाडले.

संघातील खेळाडू समीर निषाद, हुसेन लचकनवर, शादाब शहा, आकाश हुल्लूर आणि अश्पाक शहा यांनी प्रभावी खेळ करत संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. संघाच्या या शानदार यशाचे श्रेय क्रीडा शिक्षक रऊफ खान पठाण तसेच माजी विद्यार्थी संदेश मुखिया आणि गोपाल वैष्णव यांच्या मार्गदर्शनाला जाते.

विजेतेपद मिळवलेल्या संघाचा शाळेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. विद्याधर शिरोडकर, उपाध्यक्ष यशवंत गावस, सचिव राजन कडकडे आणि मुख्याध्यापिका हेमा चानेकर यांनी अभिनंदन व सत्कार करून गौरव केला आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

राज्य क्रीडा संघटक अनंत सावळ यांनी विजेत्या संघाला राज्यस्तरीय विभागीय पदके, प्रमाणपत्रे आणि विजेतेपद ट्रॉफी प्रदान केली व संघाच्या मेहनतीचे विशेष कौतुक केले. संघाच्या या विजयामुळे संपूर्ण डिचोली परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## साखळी येथे जागतिक योगदिनी घातले १०८ सूर्यनमस्कार

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. ७ :** रथसप्तमी आणि जागतिक सूर्यनमस्कार दिनाचे औचित्य साधून महिला पतंजली योग समिती गोवा आणि पतंजली योग समिती डिचोली–साखळी प्रभागातर्फे रविंद्रभवन सांखळी येथे पहाटे ५.३० ते ६.३० या वेळेत झालेल्या कार्यक्रमात साधकांतर्फे १०८ सूर्यनमस्कार घालण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून सुलक्षणा सावंत, पतंजली परिवाराच्या गोवा राज्य महिला प्रभारी सौ.संध्या खानोलकर,गोवा राज्य कार्यकारिणीचे सदस्य भरतेश घुळंनवर,डिचोली तालुका पतंजली अध्यक्ष नीलेश गुणाजी, डिचोली तालुका महिला प्रभारी स्नेहा देसाई, भारत स्वाभिमान साखळी प्रभागचे प्रभारी मनोहर गावस, साखळी प्रभाग महिला प्रभारी सिद्धी गुणाजी उपस्थित होते.



**साखळी : १०८ सूर्यनमस्कार घातलेल्या साधकांसोबत सुलक्षणा सावंत व इतर.**

यात पतंजली योग समितीने स्थापित केलेल्या वेगवेगळ्या १२ वर्गातील सुमारे १०० साधक उपस्थित होते. सर्व साधकांनी १०८ सूर्यनमस्कार घालून कार्यक्रम यशस्वी केला.सौ.सुलक्षणा सावंत यांनी आपल्या भाषणात सूर्यनमस्काराचे महत्त्व पटवून देताना त्यासाठी श्वासोच्छवास तंत्राचा योग्य वापर करावा जेणेकरून शारीरिक आणि मानसिक बळ वाढेल असे सांगितले. तसेच १०८ सूर्यनमस्कार घातल्याबद्दल संध्या खानोलकर यांनी सर्व साधकांचे कौतुक केले.परमपूज्य स्वामी रामदेवबाबा व श्रद्धेय आचार्य बाळकृष्णजी यांच्या प्रेरणेतून विविध ठिकाणी चालणाऱ्या निशुल्क नियमित योग वर्गांना येऊन आसने,प्राणायाम,सूर्यनमस्कार आदी साधनेच्या मार्गातून आपले जीवन निरोगी करण्याचे आवाहन सर्वांना करण्यात आले.या कार्यकामाचे सूत्रसंचालन सौ. सिद्धी गुणाजी यांनी केले तसेच आभारप्रदर्शन निलेश गुणाजी यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पतंजलीचे सर्व पदाधिकारी,सर्व योग वर्गाचे शिक्षक व साधक यांनी परिश्रम घेतले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १५६ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 156 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .